# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,कोल्हापूर विभागीय मंडळ, राजेंद्रनगर, कोल्हापूर - ४

क्र.कोविमं/उ.मा./परीक्षा/ 706
दिनांक: २०/०६/२०१९

प्रति,

प्राचार्य,

सर्व मान्यताप्राप्त क.महाविद्यालये,(सातारा,सांगली,कोल्हापूर.)

विषय: **जुलै-ऑगस्ट २०१९ मध्ये घेण्यात येणा-या उच्च माध्यमिक (१२ वी) प्रमाणपत्र परीक्षेची आवेदनपत्रे ऑनलाईन सादर करणेसाठी मुदतवाढीबाबत..**

उपरोक्त विषयाबाबत कळविण्यात येते की, मंडळामार्फत जुलै-ऑगस्ट २०१९ मध्ये घेण्यात येणा-या उच्च माध्यमिक (१२ वी) प्रमाणपत्र परीक्षेची नियमीत,पुनर्परिक्षार्थी,नांव नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी तसेच श्रेणी सुधार योजनेअंतर्गत व तुरळक विषय घेवून प्रविष्ठ होणा-या विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार आहेत.

सदर परीक्षेस प्रविष्ठ होऊ इच्छिणा-या विद्यार्थ्यांची परीक्षेची आवेदनपत्रे ऑनलाईन पध्दतीने www.mahahsscboard.maharashtra.gov.in किंवा www.mahahsscboard.in या संकेत भरावयाची आहेत. **मुदतवाढीच्या तारखा खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आल्या आहेत.**

| शुल्क प्रकार | उच्च माध्यमिक शाळा /कनिष्ठ महाविद्यालयामार्फत ऑनलाईन पध्दतीने आवेदनपत्रे भरावयाच्या मुदतवाढीच्या तारखा | उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी बँकेत चलनाव्दारे शुल्क भरावयाच्या तारखा ( नियमित व विलंब शुल्कासह ) | उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी **विभागीय मंडळाच्या जिल्हा निहाय वितरण केंद्रावर** शुल्क भरल्याच्या चलनासह विद्यार्थ्यांच्या याद्या जमा करावयाची तारीख |
|---|---|---|---|
| **विलंब शुल्कासह** | **शनिवार दिनांक १५/०६/२०१९ ते सोमवार दिनांक २४/०६/२०१९** | **सोमवार दिनांक २४/०६/२०१९ ते शनिवार दिनांक २९/०६/२०१९** | **मंगळवार दिनांक ०२/०७/२०१९** |
| • **महत्वाचे : नियमित शुल्कासह तसेच विलंब शुल्कासह आवेदनपत्रे सादर केलेल्या विद्यार्थ्यांचे शुल्क दोन स्वतंत्र चलनाद्वारेच भरण्यात यावीत.** | | | |

सदर परीक्षेची आवेदनपत्रे ही ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्यात येणार असल्याने विद्यार्थ्यांनी आवेदनपत्रे त्यांच्या उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांमार्फत भरावी. सर्व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयातील प्राचार्य यांनी ऑनलाईन आवेदनपत्रे भरण्यासाठी खालील बाबी विचारात घेणे आवश्यक आहे.

१. ऑनलाईन आवेदनपत्र भरताना फेब्रुवारी-मार्च २०१९ परीक्षेत अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना त्यांची या परीक्षेतील माहिती आवेदनपत्रात ऑनलाईन घेता येईल.
२. श्रेणीसुधार करु इच्छिणा-या विद्यार्थ्यांसाठी जुलै-ऑगस्ट २०१९ व फेब्रुवारी-मार्च २०२० अशा लगतच्या दोनच संधी उपलब्ध राहतील याची नोंद घ्यावी.
३. पुणे,औरंगाबाद व कोल्हापूर विभागीय मंडळातील उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी प्रचलित शुल्क बँक ऑफ इंडियाच्या Virtual Account व्दारे मंडळाच्या खात्यामध्ये जमा करुन चलनाची प्रत व विद्यार्थ्यांच्या याद्या दिलेल्या मुदतीतच विभागीय मंडळाकडे सादर कराव्यात.
४. आवेदनपत्रांसोबत विलंब शुल्क भरल्याशिवाय त्यावरील पुढील प्रक्रिया पूर्ण होणार नाही याची नोंद घ्यावी.
५. आवेदनपत्रे विलंब शुल्काने भरावयाच्या तारखांमध्ये यापुढे कोणतीही मुदतवाढ देण्यात येणार नाही .

20.06

विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ कोल्हापूर

- **वितरण केंद्रानी वरीलप्रमाणे जमा झालेले साहित्य विहीत नमुन्यात तालुकानिहाय नोंद करुन गुरुवार दिनांक ०४.०७.२०१९ रोजी कोणत्याही परिस्थितीत कोल्हापूर विभागीय कार्यालयाकडे जमा करावयाच्या आहेत**

Rao general